# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-**
**{ प्रकल्प विभाग-१}**

नागपूर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मौजा-जाटतरोडी हॉस्पीटल जागेमध्ये आरोग्य विभागाकरीता औषधी साठवणुक केंद्र तयार करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेल्या ई-निविदातील प्राप्त एकूण सहा निविदेपैकि मे. एन.एस. मानवानी, कंत्राटदार यांचा २४% कमी दराची निम्नतम निविदा राशी रु.५,२१,५४,३८८/- ला मा.आयुक्त यांनी दि.११.०९.२०२५ रोजी मंजुरी प्रदान केलेली असुन मे. एन.एस.मानवानी यांनी रु.६,३०,९०,४८२/- (Including Charges) राशीचा कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न विचारात घेण्यास्तव मा. प्रशासक यांचे मान्यतेस्तव सादर.

**टिप** :-

१. प्रस्तुत कामाकरीता नागपूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या पदशिर्ष क्र. A४३४०११७१३०४ या मधुन करण्यात येईल.
२. सदर कामाकरिता मा. अधिक्षक अभियंता यांची रु. ६,०७,२५,६५७/- राशीचे प्राकलनास तांत्रीक मान्यता क्र. CE/PWD/TS/०६/२०२५-२६ दि.१५.०४.२०२५ प्रमाणे प्राप्त आहे.
३. विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 329/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 16/10/2025**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प-१), प्रकल्प विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मौजा-जाटतरोडी हॉस्पीटल जागेमध्ये आरोग्य विभागाकरीता औषधी साठवणुक केंद्र तयार करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेल्या ई-निविदातील प्राप्त एकूण सहा निविदेपैकि मे. एन.एस. मानवानी, कंत्राटदार यांचा २४% कमी दराची निम्नतम निविदा राशी रु.५,२१,५४,३८८/- ला मा.आयुक्त यांनी दि.११.०९.२०२५ रोजी मंजुरी प्रदान केलेली असुन मे. एन.एस.मानवानी यांनी रु.६,३०,९०,४८२/- (Including Charges) राशीचा कार्यादेश निर्गमित करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.